[Date]

# 1 थेस्सलनीकाकरांस

1 Thessalonians

# 1 थेस्सलनीकाकरांस

## 1

1 पौल आणि सिल्वान व तीमथ्य यांच्याकडून थेस्सलनीकाकरांच्या चर्चच्या नांवे जे परमेश्वर पिता आणि प्रभू येशू
ख्रिस्तांठायी आहे, त्यां तुम्हांला अनुग्रह व शांति मिळत राहो.
2 आम्ही आपल्या प्रार्थनांत तुमचे स्मरण करितो आणि नेहमी तुम्हां सर्वांविषयी परमेश्वराचा धन्यवाद करितो. 3 आम्ही
आपला परमेश्वर व पिता याच्यासमोर तुमचे विश्वासाचे कार्य व प्रेमाचे परिश्रम आणि आपल्या प्रभू येशू ख्रिस्तांत
आशेच्या धीराविषयी सर्वदा आठवण ठेवितो. 4 हे बंधूनों, परमेश्वराच्या प्रिय लोकांनो, आम्हांला ठाऊक आहे, की तुम्ही
निवडलेले आहा. 5 कारण आम्ही सांगितलेली सामर्थ्य आणि पवित्र आत्म्याच्या मोठ्या निश्चयाने तुमच्यापर्यंत पोहंचली
होती. तुम्हांला ठाऊक आहे की, आम्ही तुमच्यासाठी, तुमच्याबरोबर कसे झालो होतो. 6 तुम्ही मोठ्या छळामध्ये
असतानाही पवित्र आत्म्याच्या आनंदाने वचन ग्रहण केले आणि प्रभूसारखे वर्तन करू लागला. 7 याच कारणास्तव तुम्ही
मासेदोनिया व अखयांतील सर्व विश्वासींसाठी एक नमूना झाला होता. 8 कारण तुमच्याकडून केवळ मासेदोनिया व
अखयांत प्रभूंचा संदेश ऐकविला गेला, इतकेच केवळ नव्हे तर, तुमच्या परमेश्वरावरील विश्वासाची, प्रत्येक ठिकाणी
अशी चर्चा होते आहे की आम्हांला कांही सांगण्याची गरज नाही. 9 कारण ते स्वतःच आमच्याविषयी सांगतात की
तुमच्याजवळ आमचे येणे कसे झाले आणि तुम्हांला जिवंत व सत्य परमेश्वराची सेवा करितां यावी म्हणून तुम्ही कसे
मूर्तीपासून परमेश्वराकडे वळला. 10 आणि त्याच्या पुत्राची स्वर्गातून येण्याची वाट पाहत रहा ज्याने त्यांना मेलेल्यांतून
जिवंत केले, अर्थात येशूंची, जे आपल्याला भावी दंडापासून वाचविणार आहेत.

## 2

1 हे बंधूभगिनींनो, आमचे तुमच्याकडे येणे बेकार झाले नाही हे तुम्हांलाही ठाऊक आहे. 2 पूर्वी फिलिप्पैंत दुःख भोगून
आणि उपद्रव सहन केल्यानंतरही आपल्या परमेश्वराने आम्हांला अशी हिंमत दिली, की आम्ही परमेश्वराची येशू-वार्ता
भारी विरोध होत असतानाही तुम्हांला सांगितली हे तुम्हांला ठाऊकच आहे. 3 कारण आमचा उपदेश भ्रम, अशुद्धता
आणि छळ यांपासूनचा नव्हता; 4 परंतु आम्हांला योग्य जाणून ज्याप्रमाणे परमेश्वराने येशू-वार्ता सोपविली, त्याचप्रमाणे
आम्ही तीच येशू-वार्ता सांगतो व तसे करीत असताना आम्ही मनुष्यांना नव्हे तर जे आमची अंतःकरणे पारखतात त्या
परमेश्वराला प्रसन्न करितो. 5 जसे तुम्हांला ठाऊकच आहे की आम्ही कधी खुशमस्करीच्या (खुशामद) गोष्टी केल्या
नाहीत आणि लोभासाठी कधी बहाणाही केला नाही. परमेश्वर आमचा साक्षीदार आहे. 6 जरी आम्ही ख्रिस्तांचे प्रेषित
असल्यामुळे तुमच्यावर ओझे (वजन) टाकू शकत होतो, तरी आम्हांला मनुष्यांचा आदर नको होता आणि तुमच्याकडून
किंवा दुसऱ्यांकडूनही आम्हांला सम्मान नको होता. 7 परंतु ज्या प्रकारें माता आपल्या बाळकांचे पालनपोषण करीत
असते, त्याच प्रकारें आम्ही देखील तुमच्यामध्ये राहून कोमलता दर्शविली आहे, 8 आणि तसेच आम्हांला तुमची ओढ
(तळमळ) लागलेली आहे, फक्त परमेश्वराची येशू-वार्ताच नव्हे तर आपआपले प्राण देखील तुमच्याकरिता द्यावयास
आम्ही तयार होतो ,कारण तुम्ही आमच्यासाठी मौल्यावान झाला होता. 9 हे बंधूभगिनींनो, तुम्हांला आमचे परिश्रम आणि
कष्ट यांचे स्मरण आहे, की आम्ही रात्रंदिवस यांसाठी
10 कष्ट करीत तुम्हांला परमेश्वराची येशू-वार्ता सांगितली, की तुमच्यांपैकी कोणावरही आमचा भार होऊ नये. 11 तुम्ही
स्वतःच याविषयी साक्षी आहा आणि परमेश्वर देखील, की तुम्हां विश्वास ठेवणाऱ्यांत आम्ही कशा प्रकारे पवित्रता आणि
निर्दोषतेने वागलो (राहिलो). तुम्हांला ठाऊक आहे की, जसा पिता आपल्या मुलांबरोबर वर्तन (व्यवहार) करितो, तसेच
आम्ही देखील तुम्हांपैकी प्रत्येकाला उपदेश करीत, शांति देत आणि समजावीत होतो; 12 याकरितां की तुमचे चरित्र त्या
परमेश्वराच्या योग्यतेचे (त्यांना शोभेल असे) असावे; जो तुम्हांला आपल्या राज्यांत व महिमेत बोलावित आहे.

[13] म्हणूनच आम्ही देखील परमेश्वराचा धन्यवाद निरंतर करीत आहोत, की ज्या वेळी आमच्याद्वारें परमेश्वराचे वचन
तुमच्याजवळ पोहचले, त्या वेळी तुम्ही ते मनुष्यांचे नव्हे तर परमेश्वराचे वचन म्हणून (आणि खरोखर ते असे आहेच)
स्वीकार केले. ते वचन तुमच्यांत अर्थात विश्वास ठेवणाऱ्यांत प्रभावशाली आहे. [14] भावांनो, बहिणींनो, तुम्ही त्या
चर्चसारखे जीवन जगूं लागला, ज्या यहूदीयांत ख्रिस्त येशूंठायी आहेत, कारण तुम्ही देखील आपल्या लोकांकडून तसेच
दुःख भोगले, जसे त्यांनी यहूदी लोकांच्याद्वारे सोसले होते, [15] ज्यांनी प्रभू येशूंना आणि संदेष्टयांना देखील मारून टाकले
आणि आम्हांलाही छळले. परमेश्वर त्यांच्यामुळे प्रसन्न नाही आणि ते सर्व माणसांचाही विरोध करीत आहेत. [16] कारण ते
गैरयहूदी लोकांशी बोलण्याची आम्हांस मनाई करितात, यासाठी की आपल्या अपराधांचे माप त्यांनी सदा भरीत रहावे,
पण त्यांच्यावर परमेश्वराची भयावह शिक्षा आलेली आहे.
[17] हे माझ्या बंधूनों भगिनींनो, आम्ही केवळ थोडका वेळ, हृदयाने नव्हे तर प्रगट रूपाने तुमच्यापासून वेगळे झालो
होतो, म्हणूनच आम्ही मोठ्या तीव्र इच्छेने तुमचे तोंड पाहण्याचा आणखी अधिक प्रयत्न केला. [18] म्हणून आम्ही
(अर्थात मी पौलाने) एकदां नव्हे, तर दोनदां तुमच्याकडे येण्याची मनीषा बाळगली, परंतु सैतानाने आम्हांला अडवून
ठेविले होते. [19] आमची आशा किंवा आनंद किंवा उल्लास याचा मुगूट काय आहे? आपल्या प्रभू येशूंच्यासमोर, त्यांच्या
आगमनाच्या वेळी तुम्हीच नसाल काय? [20] आमचा महिमा आणि आनंद तुम्हींच आहांत.

# 3

[1,2] म्हणून जेव्हां आमच्याने आणखी रहावेना, तेव्हां आम्ही विचार केला की आम्ही अथेनैंतच एकटे रहावे ,आणि
आम्ही तीमथ्याला जो ख्रिस्तांच्या वार्तेत आमचा भाऊ व परमेश्वराचा सेवक आहे यासाठी पाठविले, की त्याने तुम्हांला
स्थिर करावे आणि तुमच्या विश्वासाविषयी तुम्हांस समजवावे, [3] की कोणीही या संकटांत डळमळीत होऊन जातां कामा
नये, कारण तुम्हांला स्वतःला हे ठाऊकच आहे की, आपण या सर्व गोष्टींसाठीच नेमले गेलो आहोंत. [4] कारण आधीही
ज्या वेळी आम्ही तुमच्याजवळ होतो, त्या वेळी तुम्हांला सांगत होतो, की आपल्याला संकटाचा अनुभव घ्यावा लागेल
आणि असेच झाले देखील आणि तुम्हांला ते कळलेलेही आहे. [5] या कारणास्तव जेव्हां मला आणखी दम धरणे अशक्य
झाले तेव्हां तुमच्या विश्वासांविषयी माहिती घेण्याकरितां पाठविले, याकरितां की असे होतां कामा नये ,की परीक्षा
घेणाऱ्याने तुमची परीक्षा घेतली असावी आणि आमचे परिश्रम व्यर्थ झाले असावेत.
[6] पण आतां तीमथ्य जो तुमच्याकडून आमच्यांकडे आला, येथे येऊन आम्हांला तुमचा विश्वास व प्रेम याचा समाचार
दिला आणि आम्ही त्याने हे देखील सांगितले, की तुम्ही सदा प्रेमाने आमचे स्मरण करितां आणि जशी आम्ही तुम्हांला
भेटण्याची उत्कंठा बाळगतो तशी तुम्हीही आम्हांला भेटावयाची तीव्र इच्छा बाळगतां. [7] म्हणून हे बंधूभगिनींनो, आम्ही
आपल्या सर्व कष्टांत व छळांत तुमच्या विश्वासांविषयी शांति प्राप्त केली. [8,9] आता जर तुम्ही प्रभूंमध्ये स्थिर व दृढ उभे
राहिलात तर आम्ही जिवंत असल्यासारखे आहोत. जो आनंद आम्हांला तुमच्यामुळे आपल्या परमेश्वरासमक्ष होतो आहे,
त्याच्याकरितां आम्ही तुमच्याविषयी परमेश्वराची कशी स्तुति करावी? कसे आभार मानावे? [10] रात्रंदिवस आम्ही
पुष्कळच प्रार्थना करीत असतो की, तुमचे तोंड पाहावे आणि तुमच्या विश्वासाची जी पोकळी (कमी) आहे ती भरून
काढावी, पूर्ण करावी.
[11] आता आपला परमेश्वर आणि प्रभू येशू, तुमच्याकडे येण्याविषयी आमचे मार्गदर्शन करोत. [12] आणि जसे आम्ही
तुमच्यावर प्रेम करितो तसेच तुमचे एकमेकांवरील आणि सर्व लोकांवरील प्रेम विपुल व्हावे, असे प्रभू करोत. [13] यासाठी
की जेव्हां आपले प्रभू येशू आपल्या सर्व पवित्र लोकांसमवेत येतील, तेव्हां त्यांनी तुमची हृदयें, आपल्या परमेश्वरासमोर,
पवित्रतेंत निर्दोष ठरवावीत.

# 4

1 शेवटी माझ्या भाऊबहिणींनो, आम्ही तुम्हांला अशी विनंती करितो आणि प्रभू येशूंठायी समजावितो, की
आमच्याकडून जसे तुम्ही खरे (सात्विक) जीवन जगणे आणि परमेश्वराला संतुष्ट करणे शिकलां आहांत आणि जसे तुमचे
जीवन आहे देखील, तसेच आणखी अधिक वृद्धींगत (वाढत) होत चला. 2 कारण तुम्हांला ठाऊक आहे, की आम्ही प्रभू
येशूंतर्फे तुम्हांला कोणती आज्ञा पोहंचविली होती.
3 कारण परमेश्वराची इच्छा हीच आहेत की तुम्ही पवित्र व्हावे अर्थात व्यभिचारांपासून स्वतःला जपावे (अलिप्त
ठेवावे). 4 यासाठी की तुमच्यांपैकी प्रत्येकाला पवित्रता व आदरांसह आपला “जीवन-जोडीदार” (साथीदार) मिळवून
घेता यावा. 5 आणि हे कार्य तुम्ही अभिलाषांच्या आहारी (वाहून जाणे) जाऊन करूं नये, तसेच त्या लोकांसारखेही करू
नये जे परमेश्वराला ओळखत नाहीत. 6 कोणीही या बाबतीत आपल्या भावाला फसवूं नये आणि त्याच्याविषयी अपराध
करूं नये, कारण प्रभू या सर्व गोष्टींचा सूड घेणार आहे आणि आम्ही तुम्हांला यापूर्वी तसे सांगितले होते आणि
बजावलेंही होते. 7 कारण परमेश्वराने आपल्याला अशुद्ध होण्यासाठी नव्हें परंतु पवित्र होण्याकरितां बोलाविलेले आहे.
8 यास्तव जो कोणी या गोष्टी तुच्छ जाणतो, तो मनुष्यांना नव्हे तर परमेश्वरालाच तुच्छ लेखितो, त्याच परमेश्वराला जो
तुम्हांला आपला पवित्र आत्मा देतो.
9 पण बंधुप्रेमांविषयी हे आवश्यक नाही की मी तुम्हांला कांही लिहावें कारण आपसांत प्रेम करावे (राखणे) याविषयी
तुम्ही स्वतःच परमेश्वरापासून शिकला आहांत. 10 तुम्ही सबंध मासेदोनियांतील सर्व भाऊबहिणींवर तसेच प्रेम करितां
देखील. हे भाऊबहिणींनो, आम्ही तुम्हांला समजवून सांगतो आहोत, की आणखी अधिक वाढत जा, 11 जशी आम्ही
तुम्हांला आज्ञा केली आहे, त्याचप्रमाणे शांत-गुपचुप राहून आपआपले कामकाज करीत आणि आपल्या हातांनी काम
करून कमविण्याचा (उदरनिर्वाह करण्याचा) प्रयत्न करा; 12 बाहेरच्या लोकांकडून तुम्हांस आदर मिळावा आणि
तुम्हांला कोणत्याच वस्तूची उणीव भासूं नये.
13 हे माझ्या बंधूभगिनींनो, जे झोपी गेले आहेत (किंवा मेलेले आहेत) त्यांच्याविषयी तुम्ही अजाण असावे अशी
आमची इच्छा नाही,
14 आणि अजाण राहून तुम्ही त्या लोकांसारखा विलाप करावा ज्यांना आशा नाही. जर आपण विश्वास करतो, की येशू
मेले आणि पुन्हा जिवंतही झाले, तर अगदी त्याचप्रमाणे, जे येशूंठायी झोपी गेले आहेत त्यांना परमेश्वर त्यांच्याबरोबरच
घेऊन येतील. 15 प्रभूच्या वचनानुसार आम्ही तुम्हांला सांगतो की आपण जे जिवंत आहोत, आणि प्रभूंचे आगमन
होईपर्यंत जिवंत असू, तर आपण झोपलेल्यांच्या (मेलेल्यांच्या पुढे) कधीही आधी जाणारच नाही. 16 प्रभू स्वतःच
स्वर्गातून उतरतील. त्यासमयी गर्जनेचा व आद्य (प्रमुख) देवदूताचा शब्द ऐकूं येईल आणि परमेश्वराच्या कर्णाच्या
आवाजांसह जे ख्रिस्तांमध्ये मेलेले आहेत, ते प्रथम जिवंत उठतील.
17 त्यानंतर आपण जे जिवंत आणि उरलेले असू, त्यांच्याबरोबर मेघावर उचलले जाऊ, यासाठी की हवेत प्रभूची भेट
घेऊन आणि याच प्रकारे आपण सदासर्वदा प्रभू बरोबर वास करू. 18 या गोष्टींनी एक दुसऱ्यांला शांति देत चला.

# 5

1 हे भाऊबहिणींनो, समय आणि युगांविषयी तुम्हांला काही शिकविले जावे याची गरज नाही. 2 कारण तुम्हांला
स्वतःला ठामपणे ठाऊक आहे, की जसा रात्री चोर येतो तसाच प्रभूंचा दिवस येणार आहे.
3 ज्या वेळी लोक असे म्हणत असतील की कुशल आहे, कांही भीति नाही त्या वेळी त्यांच्यावर अचानक विनाश
येईल. ज्या प्रमाणे गर्भवती स्त्रीवर अचानक प्रसूति पीडा येत असते, त्याच प्रमाणे त्यांच्यावरही वेदनेचा समय येईल
आणि ते कशाही रीतिने वाचूं शकणार नाहीत (सुटूं शकणार नाहीत). 4 तो दिवस तुमच्यावर चोराप्रमाणे येऊन ठेपावा,
इतके अज्ञानतेत व दुष्टाईत तुम्ही नाही. 5 कारण तुम्ही सर्व जण प्रकाशाचे संतान आणि दिवसांचे संतान आहा, आपण
रात्रीचे व अंधकाराचे नाही. 6 म्हणून आपण दुसऱ्यांसारखे झोपत राहूं नये, पण जागृत (जागें) व सावध रहावे. 7 कारण
जे झोपतात, ते रात्रीच झोपतात आणि जे झिंगतात, ते रात्रीच झिंगत असतात. 8 परंतु आपण जे दिवसाचे आहोंत, त्या

आपण विश्वास व प्रेमाचे कवच घालून व मुक्तीच्या आशेची टणक टोपी घालून सावध रहावे,
[9] कारण परमेश्वराने आपल्याला दंडासाठी नव्हे, तर यासाठी नेमलेले आहे की आपण आपल्या प्रभू येशू ख्रिस्तांद्वारे
उद्धार प्राप्त करावा; [10] आपल्याकरितां ते यासाठी मरण पावले, की आपण जागे असूं किंवा झोप घेत असूं, तरी आपण
सर्वांनी मिळून त्यांच्याबरोबर जगावे (जिवंत रहावे).
[11] यास्तव तुम्ही एकमेकांला शांति देत चला आणि एकमेकांच्या उन्नतिकरितां प्रयत्नशील व्हा, जसे की तुम्ही करितां
सुद्धा. [12] आम्ही तुम्हांला विनंती करितो, की तुमच्यांमध्ये जे परिश्रम करितात आणि प्रभूमध्ये जे तुमचे पुढारी आहेत
आणि तुम्हांला शिकवितात, त्यांच्या शिकवणीकडे लक्ष असू दया. [13] त्यांच्या कामामुळे प्रेमाने त्यांना अत्याधिक
आदरयोग्य समजा, आपसांत मेळ व शांतीने रहा.
[14] हे भाऊबहिणींनो, आम्ही तुम्हांला समजावीत आहोंत की ज्यांची वागणूक व्यवस्थित-नीट नाही, त्यांना समजावून
ताकीद द्या. जे भय बाळगतात त्यांना हिंमत द्या, अशक्त व दुबळयांचा सांभाळ करा, सर्वांसाठी सहनशीलतेची वागणूक
ठेवा. [15] सावध असा! कोणी कोणाशीही वाईटाबद्दल वाईट करू नये, परंतु त्या विपरित नेहमी चांगले करीत राहण्यात
तत्पर रहा,आणि सर्वाचे चांगले करण्याचाच प्रयत्न करा.
[16] सर्वदा खुश असा, [17] निरंतर प्रार्थना करीत रहा, [18] प्रत्येक गोष्टींत (परिस्थितींत) उपकारस्तुति प्रगट करीत रहा,
कारण तुमच्याकरितां ख्रिस्त येशूंत परमेश्वराची हीच इच्छा आहे.
[19] आत्म्याला विझवूं नका. [20] भविष्यवाणीस तुच्छ लेखूं नका. [21] सर्व गोष्टींची पारख करा, जे चांगले आहे ते घट्ट धरा.
[22] प्रत्येक प्रकारच्या वाईटापासून दूर रहा.
[23] शांतीचा परमेश्वर स्वतःच तुम्हांला पूर्णप्रकारें पवित्र करो आणि तुमचा आत्मा, प्राण व शरीर आपल्या प्रभू येशू
ख्रिस्तांच्या आगमनापर्यंत संपूर्णपणें राखली जावोत व निर्दोष राहोत. [24] तुम्हांस बोलाविणारे खरे आहेत आणि ते असेच
करतील.
[25] हे बंधूंनो, आमच्याकरितां प्रार्थना करा. [26] सर्व भावांना सलाम. [27] मी तुम्हांला प्रभूची शपथ वाहतो, की हे पत्र सर्व
भावांना वाचून ऐकविले जावे.
[28] आपल्या प्रभू येशू ख्रिस्तांची असीम कृपा तुमच्यावर कायम असो.